BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNCIPAL CORPORATION
BHIWANDI (DIST- THANE)
OLD S.T.STAND KAP-ALI
BHIWANDI – 421 302,DIST-THANE

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी,जि.ठाणे, महाराष्ट्र.
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२,जि.ठाणे

TEL :- 02522-255314/255315,FAX :- 02522-252565, e mail – envbncmc@gmail.com

वृत्तविशेष क्र. दिनांक :- ०१/११/२०२१

**मसुदा**

## दिपावली सण साजरा करताना नागरिकांनी कोविड - १९ नियमांचे पालन करावे

## महापौर, प्रतिभा पाटील व आयुक्त, सुधाकर देशमुख यांचे नागरिकांना आवाहन

भिवंडी :- कोरोनाची दुसरी लाट जरी ओसरली असली तरी अजूनही कोरोनाचा धोका कायम आहे. कोविड रोगाचा प्रादुर्भाव विचारात घेवून नागरिकांनी मोठया प्रमाणात एकत्र येवून गर्दी करू नये. उत्सव साजरा करताना सर्व नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातुन योग्य ती खबरदारी घ्यावी. दिपावलीत फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे होणारे ध्वनी व वयु प्रदुषण लक्षात घेवून फटाके फोडण्याचे टाळावे. तसेच महापालिकेने जारी केलेल्या नियमांचे व सूचनांचे पालन करावे असे आवाहन **महापौर, प्रतिभा पाटील व आयुक्त, श्री सुधाकर देशमुख** यांनी भिवंडी नागरिकांना केले आहे.

कोविड संसर्गामुळे बंद करण्यात आलेली भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील धार्मिक स्थळे खुली करण्यात आली असली तरी दिपावली उत्सव घरगुती स्वरूपात मर्यादित राहिल याची दक्षता घ्यावी. दिपावली उत्सवानिमित्त कपडे, फटाके, दागदागिने व इतर वस्तू खरेदी करणेसाठी दुकानात व रस्त्यांवर गर्दी होत असते. तथापि नागरिकांनी शक्यतो गर्दी टाळावी, विशेष करून ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले यांनी घराबाहेर पडणे टाळावे तसेच मास्कचा वापर आणि सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे, जेणेकरून कोरोनाचा संसर्ग वाढणार नाही.

दिपावली हा दिव्यांचा तसेच प्रकाशाचा उत्सव मानला जातो. या उत्सवादरम्यान दरवर्षी मोठया प्रमाणावर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येते. त्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषणाची पातळी वाढून नागरिकांच्या व प्राणीमात्रांच्या आरोग्यावर होणारे विपरित परिणाम दिपावली उत्सवानंतर बराच कालावधीनंतर दिसून येतात. कोरोना आजार झालेल्या किंवा होऊन गेलेल्या नागरिकांना फटाक्यांच्या धुरामुळे वायू प्रदुषणाचा त्रास होण्याची भीती आहे ही विचारात घेवून नागरिकांनी यंदा फटाके फोडण्याचे टाळावे, त्याऐवजी दिव्यांची आरास करूनउत्सव साजरा करावा असेही **महापौर, प्रतिभा पाटील व आयुक्त, सुधाकर देशमुख** यांनी नमूद केले आहे.

शासनाच्या ब्रेक द चेन अंतर्गत दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार कोरोनाचे नियम शिथिल करण्यात आले असले तरी देखील नागरिकांनी मोठया प्रमाणावर एकत्रित येण्यावर निर्बंध कायम ठेवले आहेत. त्यामुळे दिवाळी पहाट व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करताना मार्गदर्शक सुचनांमधील नियमांचे

BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNCIPAL CORPORATION
BHIWANDI (DIST- THANE)
OLD S.T.STAND KAP-ALI
BHIWANDI – 421 302,DIST-THANE

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी,जि.ठाणे, महाराष्ट्र.
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२,जि.ठाणे

TEL :- 02522-255314/255315,FAX :- 02522-252565, e mail – envbncmc@gmail.com

काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी. शक्यतोवर अशा कार्यक्रमांचे ऑनलाईन, केबल, नेटवर्क, फेसबुक इत्यादी माध्यमांद्वारे प्रसारण करण्यावर भर देण्यात यावा. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम शिबिरे आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यु इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी, मात्र त्या ठिकाणी देखील लोकांनी एकाच वेळी मोठया प्रमाणात एकत्रित येणार नाही याची दक्षता घ्यावी.

कोविड - १९ या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनवर्सन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकिय शिक्षण विभाग तसेच भिवंडी महानगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असणार आहे. तसेच प्रत्यक्ष उत्सव कालावधीत नव्याने सूचना प्रसिध्द झाल्यास त्याचे देखील पालन करणे अत्यावश्यक आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा उल्लंघन केल्यास संबंधितांविरूध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, साथरोग अधिनियम आणि भारतीय दंडसंहिता १८६० मधील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

दिपावली हा सण उत्साहात व कोविड नियमांचे पालन करून साजरा करावा असे आवाहन करतानाच **महापौर, प्रतिभा पाटील व आयुक्त, सुधाकर देशमुख** यांनी सर्व नागरिकांना दिपवलीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.